# टीम अण्णामध्येही चांडाळ चौकडी : राजू परूळेकर

**मुंबई :** काँग्रेसमध्ये जशी चांडाळ चौकडी आहे तशी चांडाळ चौकडी टीम अण्णांमध्येही असल्याचा आरोप राजू परूळेकर यांनी केलाय.

राजू परूळेकर यांनी आपल्या नवीन ब्लॉगमध्ये अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनीष शिसोदीया ही चांडाळ चौकडी असल्याचा आरोप केला आहे.

या चौकडीनं अण्णांना देवाचा दर्जा देऊन त्यांच्या नावावर लूट सुरु केल्याचंही आपल्या ब्लॉगमध्ये म्हटलंय. राजू परूळेकर यांनी आपल्या ब्लॉगवर हे लिहलंय. अण्णा हजारे यांच्या ब्लॉगचं काम पूर्वी राजू परूळेकर पाहत होते.